# भंडारा सायबर लॅब उद्घाटन सोहळा

जा.क्र. ५१० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१५/०८/२०१६.

दि. १५/०८/२०१६ रोजी सायबर लॅब उद्घाटन सोहळा पोलीस मुख्यालयांच्या परीसरात आयोजीत करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे पालकमंत्री मा. श्री. डॉ. दिपक सावंत विधानसभेचे आमदार मा. श्री. रामचंद्र अवसरे भंडारा, व मा. जिल्हाधिकारी भंडारा श्री. अभिजीत चौधरी हे होते. तसेच जि.प. अध्यक्ष गिलोरकर मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनिता शाहु हे मान्यवर उपस्थित होते.

सद्याचे आधुनिक युग हे माहीती तंत्रज्ञानाचे युग म्हणुन ओळखले जाते माहीती तंत्रज्ञानाच्या युग झपाटयाने जवळ आले आहे. माहीती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये संगनकाने मानवी जिवनातील प्रत्येक क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे. इंटरनेटचा वापर करुन ईलेक्ट्रॉनीक डाटा ट्रान्सपर केला जात असतो. तसेच ई–बॅकींग, पेपर लेस ऑफीस सोसल मिडीया यासारख्या प्रकल्पांना जन्माला आले. जेथे महत्वांची माहीती ही कागदावर न ठेवता ई –डॉकुमेंटच्या स्वरुपात असते. त्यामुळे नव नवीन तंत्रज्ञान व उपकरणे वापरुन गुन्हे करण्याचे प्रमाण देखील दिवसेंनदिवस वाढत आहे. तसेच गुन्हेगारी करण्याच्या पध्दतीमध्ये ही बरीच आमुलाग्र बदल झाल्याने निदयर्शनास आले आहेत. इंटरनेटच्या माध्यमातुन व इतर अनेक अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारीत घडणा–या गुन्हयांची तसेच सायबर गुन्हयाची संख्या व प्रकार दिवसेनदिवस उग्र रुप धारण करीत आहे.

यावर नियत्रंण आणण्याकरीता व सायबर गुन्हयांना प्रतिबंध घालण्याकरीता गृह विभागामार्फत महाराष्ट्र सायबर प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला होता. याप्रकल्पा अंतर्गत भंडारा जिल्हयात सायबर लॅब स्थापन मान्यवरांच्या हस्ते स्थापन करण्यात आला. यामुळे जिल्हयातील सायबर गुन्हेगारीवर वचक बसण्याबरोबरच गुन्हयाची उकल तात्काळ करणे व आरोपींचा तात्काळ शोध लागण्यास मदत होणार असुन सायबर गुन्हयात आळा घालण्यासाठी भंडारा जिल्हा पोलीस कटीबंध्द आहे.

यावेळी कार्यक्रमाला मा.पालकमंत्री भंडारा, श्री. डॉ. दिपक सांवत, विधानसभेचे आमदार मा. श्री. रामचंद्र अवसरे भंडारा, मा. जिल्हाधिकारी भंडारा श्री. अभिजीत चौधरी, जि.प.अध्यक्ष गिलोरकर, मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता शाहु तसेच भंडारा पोलीस दलातील विविध शाखेचे/पोस्टेचे पोलीस अधिकारी/कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी, ईलेक्ट्रॉक मिडीया, पत्रकार बंधु, व मोठया प्रमाणात विविध क्षेत्रातील जनसमुह उपतस्थित होता. कार्यक्राचे सुत्रसंचालन उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. जोंगदंड भंडारा व उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. विक्रम साळी साकोली आभार प्रदर्शन यांनी केले.

( श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६१९१९१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.